# भगिनी निवेदिता सहकारी बँक मर्यादित, पुणे

<u>दि.३१/१२/२०२४ रोजीच्या मा.संचालक मंडळ ठराव क्र. १२ मंजूर झालेली</u>

<u>लॉकरसंदर्भातील **Standard Operation Procedure (SOP)**</u>

१) बँकेच्यावतीने लॉकर उपलब्ध असणाऱ्या शाखांमध्ये इच्छुक ग्राहकांना लॉकर पुरविण्यात येतील.

२) लॉकर सुविधेसाठी आलेल्या प्रत्येक अर्जाची दखल घेण्यात येईल.

३) शाखेत लॉकर शिल्लक नसल्यामुळे लॉकर सुविधा देता येत नसल्यास सदर अर्जाची नोंद Core Banking System मध्ये प्रतिक्षा यादीत करण्यात येईल व प्रतिक्षा यादी क्रमांकासह ग्राहकास पोहोच देण्यात येईल, ज्यायोगे व्यवहारामध्ये पारदर्शकता राहिल.

४) <u>लॉकर करार</u>– Indian Bank Association च्या Model locker agreement च्या धर्तीवर बँकेच्या विद्यमान संचालक मंडळ सभेने मंजूर केलेल्या करारानुसार लॉकर करार करण्यात येईल. लॉकर कराराची साक्षांकित प्रत लॉकरधारकास देण्यात येईल.

५) <u>लॉकर ऑपरेशन</u>– लॉकरधारक स्वत: अथवा त्यांनी नेमून दिलेल्या व्यक्तीची बँकेच्या रेकॉर्डनुसार ओळख पटवून त्यांची रजिस्टरमध्ये सही घेऊन बँकेच्या सक्षम अधिकाऱ्याने स्वत: सही करुन लॉकरधारकास लॉकर ऑपरेट करुन देण्यात येईल.

६) लॉकरला बँकेची मास्टर किल्ली लावण्यात येईल. लॉकर धारकाने त्याची किल्ली लावून, लॉकर उघडताच त्यांना मोकळेपणाने लॉकर ऑपरेट करता यावा म्हणून बँकेच्या सेवकाने बँकेच्या मास्टर किल्लीसह Locker Room च्या बाहेर जाणे आवश्यक राहिल.

७) लॉकर ऑपरेट केलेल्या दिवशीच बँक लॉकरधारकांना त्यांच्या रजिस्टर ई–मेल अथवा मोबाईलवर लॉकर ऑपरेशनबाबत तारीख, वेळेसह सकारात्मक पुष्टीकरणासाठी सूचना /SMS देईल.

८) बँक नवीन लॉकरधारकांकडून लॉकरकरिता (३ वर्षाचे लॉकर भाडे व Locker break open ची रक्कम) मुदतठेव जमा करुन घेईल.

९) आर्थिक वर्षाच्या सुरवातीस लॉकरभाडे जमा करुन घेतल्यानंतर लॉकरधारकांनी लॉकर सुविधा समाप्त केल्यास, त्यांना उर्वरित कालावधीसाठीची लॉकर भाड्याची रक्कम GST शिवाय परत करण्यात येईल.

१०) कोणत्याही कारणास्तव बँकेचे लॉकर्स एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हलविण्यात येणार असल्यास, बँकेकडून सर्व खातेदारांना किमान २ महिने पूर्वसूचना देण्यात येईल.

११) लॉकरला असलेल्या कुलुपाखेरीज, लॉकरला सोय असल्यास खातेदार अतिरिक्त कुलुप लावू शकतील.

१२) लॉकर रजिस्टर, लॉकर किल्ली रजिस्टर तसेच दैनंदिन लॉकर व्यवहार इत्यादी सर्व नोंदी CBS मध्ये बिनचूक नोंदविण्यात येतील.

१३) बँक कामकाजाच्या दिवसाअखेर सर्व लॉकर्स व्यवस्थित बंद असल्याबाबत, तसेच लॉकररुम मध्ये कोणीही अनावधानाने अडकले नसल्याबाबत खात्री करण्यात येईल.

१४) लॉकर संदर्भातील सर्व अटी व शर्ती तसेच Standard Operation Procedure(SOP) सह व लॉकर संदर्भातील Model Locker Agreement बँकेच्या वेबसाईट वर खातेदारांच्या माहितीसाठी वेळोवेळी झालेल्या बदलांसह update करण्यात येईल.

१५) लॉकरधारकाने लॉकरमध्ये ठेवलेल्या किंवा लॉकरमधून काढलेल्या वस्तूंचे रेकॉर्ड बँक ठेवत नसल्याने, कोणत्याही परिस्थितीमध्ये लॉकरमधील वस्तूंचा (contents) इन्श्युरन्स करता येणार नाही. तसेच लॉकरमधील सामग्रीचा विमा उतरविण्याची बँकेची कोणत्याही प्रकारची जबाबदारी नाही याबाबतचा उल्लेख लॉकर करारामध्ये करण्यात येईल.

१६) लॉकरमध्ये कोणतीही बेकायदेशीर अथवा धोकादायक वस्तू ठेवता येणार नाही. तसे आढळल्यास सदर लॉकरधारकाविरुद्ध योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्याचा अधिकार बँकेस राहील. सदर मुद्याचा लॉकर करारामध्ये समावेश करण्यात येईल.

१७) लॉकरधारकास लॉकरकरिता वारसदार नेमता येईल. लॉकरधारकाने Nomination registration, cancellation and variation केल्यास, त्याची पावती लॉकरधारकास देण्यात येईल. तसेच त्याची लेखी प्रत वारसदार/उर्वरित हयात लॉकरधारक Survivors /कायदेशीर वारसा हक्कांना देण्यात येईल.

१८) मृत लॉकरधारकाच्या वारसदाराने बँकेकडे मृत्यूदाखला व claim form जमा केल्यास, पुढील १५ दिवसांच्या आत योग्य ती शहानिशा करून मा. संचालक मंडळाने ठरविलेल्या धोरणानुसार योग्य त्या format मध्ये लागू कायदे व नियामक मार्गदर्शक तत्वांना अनुसरून Inventory of contents ची पूर्तता करून लॉकरमधील वस्तू परत केल्या जातील. लॉकर धारकाने वारसदाराची नेमणूक केली नसल्यास लॉकरमधील चीजवस्तू मा. संचालक मंडळ सभा निर्णयानुसार कायदेशीर वारसाहक्कानुसार वारस असलेल्या व्यक्तींच्या ताब्यात देण्यात येईल.

१९) लॉकरधारकाची लॉकरची किल्ली हरविल्यास व त्यांनी बँकेला विनंती केल्यास/कोर्ट ऑर्डरनुसार अंमलबजावणी ऑर्डर आल्यास किंवा लॉकरधारक बँकेच्या अटींची व शर्तींची पूर्तता करण्यात कुचराई करत असल्यास, बँकेला सदर लॉकर open करण्याचा संपूर्ण अधिकार राहील. लॉकर break open करण्याच्या संपूर्ण खर्चाची जबाबदारी लॉकर धारकाची राहील. सदर लॉकर लॉकरधारक व बँक अधिकारी यांच्या समक्ष break open करून आतील चीजवस्तू ताब्यात दिल्या/घेतल्या जातील. आवश्यक असल्यास break open Procedure चे Video Shooting करण्यात येईल.

२०) बँक Model locker agreement पूर्ण अटी व शर्तीसह व Standard Operating Procedures बँकेच्या website वर, तसेच लॉकर असलेल्या शाखांमध्ये दर्शनी भागात लोकांना पाहण्यासाठी लावण्यात येईल. ज्यायोगे लॉकरधारकास लॉकर सुविधेचा लाभ घेण्यापूर्वी त्यातील अटी व शर्तीची माहिती कळू शकेल.

२१) बँकेद्धारे लॉकरसंदर्भातील घेण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या चार्जेसची अद्यावत माहिती बँकेच्या website वर display करण्यात येईल.

रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकानुसार व त्यास आधीन राहून वरील Standard Operating Procedure (SOP) मध्ये वेळोवेळी बदल करण्याचे अधिकार मा. संचालक मंडळ सभेस राहतील.